स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत

Synopsis of the Thesis Entitles

शीर्षक

"मद्यपान करणाऱ्या ग्रामीण समुदायातील तरुणांचा एक समाजशास्त्रीय अभ्यास"

(विशेष संदर्भ - लातूर जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान शाखेतील
समाजशास्त्र विषयात पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा
शोधप्रबंध आराखडा

संशोधक

बस्वराज विनायकराव पाटील

मार्गदर्शक

डॉ. वेदप्रकाश मलवाडे

समाजशास्त्र विभाग प्रमुख

श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर

ऑगस्ट - 2024

"मद्यपान करणाऱ्या ग्रामीण समुदायातील तरुणांचा एक समाजशास्त्रीय अभ्यास"

प्रस्तावना :-

भारतीय समाजव्यवस्थेत आज विविध समस्यानी थैमान घातलेले आहे. समाजात आदर्श म्हणून स्वीकारण्यात आलेल्या आचार विचारांच्या विरोधी स्थितीला संबोधण्यासाठी संशोधनात सामाजिक समस्या ही संज्ञा उपयोगात आणली जाते. सार्वजनिक सुव्यवस्था टिकवून ठेवण्याच्या मार्गात बाधक ठरणारी स्थिति म्हणजे सामाजिक समस्या होय. तसेच सार्वजनिक कल्याण साध्य करण्याच्या मार्गात बाधक ठरणारी स्थिति ही समस्या निर्माण करते. सार्वजनिक कल्याण कार्यक्रमात अडथळा निर्माण करणारी मद्यपान ही एक ज्वलंत समस्या म्हणून भारतीय समाजात दिवसेंदिवस अधिकाधिक प्रमाणात वाढ होत आहे आणि सर्वात महत्त्वाचे यामध्ये तरुणांचे प्रमाण हे अधिक असल्याचे दिसून येते.

भारतासारख्या विकसनशील देशामध्ये ज्या विविध प्रकारच्या सामुहिक समस्यांना तोंड द्यावे लागते त्यापैकी मद्यपान हे अत्यंत गंभीर आणि ज्वलंत समस्या आहे. भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. देशाचे संपूर्ण भविष्य हे तरुणांच्या हातात आहे. आजच्या या बदलत्या जीवनशैलीत संगणक इंटरनेट च्या युगात तरुणांच्या हातात मद्याचा पेला येत असतना दिसतो मा अशा तरुणांमुळे देशाचा व त्यांचा विकास कसा होईल ? हा प्रश्न उपस्थित होतो.

तरूण मद्यपान का करतात ? या विषयी अनेक विचार प्रचलित आहेत. तरुणांना फक्त कारणे लागतात. आनंद असेल, दु:ख असेल, मित्रांची मौज म्हणून गरीबी व्यवसायातील नुकसान, पार्ट्या, लग्न, समारंभ, उत्सव, जयंती, अज्ञान, दुबळेपणा, कामाचा ताण, बेकारी, मंदीची भीती अशा एक ना अनेक कारणामुळे आज तरूण मद्याच्या आहारी जात असताना दिसून येतात. त्यामुळे सर्व आर्थिक स्तरातील तरूण श्रीमंत, मध्यम वर्गीय, गरीब असे सर्व वर्गातील तरुण मद्यपान करताना दिसत आहेत. जरी मद्यपान ही एक सामाजिक अरिष्ट प्रथा असून यांचे गंभीर आहेत जरी मद्यपान हे एक सामाजिक अरिष्ट रुढी आहे. याचे परिणाम गंभीर आहेत. मद्यपानाच्या सेवनामुळे व्यक्तीच्या सारासार विचार प्रक्रिया थांबतात व विनाशाला स्वत:कडे येण्यास आमंत्रण देतात.

मद्यपानाचे व्यक्तीवर, त्याच्या शरीरावर, मनावर, कुटुंबावर, शिक्षणावर, अर्थव्यवस्थेवर व समाजावरही विविध प्रतिकुल परिणाम होत असलेले आढळतात.

या मद्यपानावर स्वातंत्र्यप्राप्तीच्या नंतरच्या काळात विविध प्रांतातील मंत्रिमंडळांनी विविध कायदे करुन दारुबंदी करण्याचे प्रयत्न केले तसेच संपूर्ण दारुबंदी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निश्चित स्वरुपाचा दारुबंदी कार्यक्रम जाहीर केला तरी पण या कायद्याचा काहीही उपयोग होत असताना दिसून येत नाही. यासाठी समाजामध्ये याचे प्रबोधन महत्त्वाचे आहे. दारुचे दुष्परिणाम त्यापासून होणारे वाईट परिणाम प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती करुन तरुणांना यापासून प्रवर्त करुन आनंदी जीवन जगता यावे त्यांचे अधिकाधिक समाज प्रबोधन व्हावे यासाठी प्रस्तुत विषय संशोधनासाठी हाती घेण्यात आला आहे.

संशोधन साहित्याचा आढावा :-

एस.डी.बेकनच्या मते - Alcoholism Natural of the problem मे लिखा है. Mast alcoholic hate liguor that drinking The hate taste hele the rusults hale themselves for succimbing. But they cant stop.

मद्यपान करणारा माणूस देखील मद्यपान करणे वाईट आहे असे मानतो. परंतु मद्यपानाच्या अधीन झाल्यानंतर तो मद्यपानापासून दूर जाऊ शकत नाही. असाच अर्थ वरील इंग्रजी विधानाचा सांगता येतो. एस.डी.बेकन थोडक्यात मांडतात की, मद्यपान ही एक अशी समस्या आहे की त्याच्या व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक अवस्था वर परिणाम होतो व सामाजिक प्रतिष्ठा नष्ट होते.

सी.बी.मेमोरया - यांनी आपल्या Social Problems and Social Bisorganization या पुस्तकात Alcoholism and Drug Addicution या प्रकरणात मद्यपानाच्या वाढत्या दुरुपयोगाला जबाबदार घटकांविषयी मते मांडले आहेत 1) प्रयोग करण्याची इच्छा 2) साहसाची इच्छा 3) स्वज्ञान मिळवण्याची इच्छा 4) समस्या पासून दूर जाण्यासाठी 5) आनंद मिळवण्यासाठी 6) सामाजिक मूल्य व ध्येयातील बदल 7) अति उष्णता किंवा अति थंडी किंवा सातत्यपूर्ण कामामुळे निर्माण होणारे असमाधान किंवा थकवा दूर करण्यासठी 8) मैत्री खातिर 9) नोकरीची अशाश्वती किंवा बेकारीचा सततचा धोका आणि भविष्याची अनिश्चितता 10) अनुवंशिक दोष 11) सामाजिक दर्जात अचानक झालेली वाढ किंवा घरात निर्माण झालेली विषमता

राम आहुजा - यांनी त्यांच्या Social Problems in India या पुस्तकात मादक पदार्थ

व मद्यपान दुरुपयोगाला प्रोत्साहन देणाऱ्या घटकाविषयी पुढील चार विभागात केले आहे. मानसशास्त्रीय घटक - 1) तणावापासून मुक्ती 2) मानसिक दुर्बलता कमी करण्यासाठी 3) अंतरबाधा कमी करणे 4) जिज्ञासाची पूर्तता करण्यासाठी 5) खिन्नता किंवा कंटाळा घालवण्यासाठी 6) तरतरी येण्यासाठी तसेच शारीरिक घटक - 1) जागृत राहण्यासाठी 2) लैंगिक अनुभवना द्विगुणीत करणे 3) यातना पासून मुक्ती मिळवणे व झोप येण्यासाठी, सामाजिक घटक - 1) सामाजिक अनुभवांना साध्य करणे 2) मित्रांद्वारे आपल्याला स्वीकारण्यात यावे 3) सामाजिक मूल्यांना आव्हान देण्यासाठी

डॉ.पी.के. मुतगी - यांनी मुंबईतील 4151 महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा अभ्यास केला असता विद्यार्थ्यांनी स्पष्ट केलेल्या व्यक्तिगत घटकात त्यांनी मते नोंदवली ते पुढील प्रमाणे 1) स्वतःची जिज्ञासापूर्ती 2) साहसाची ओढ 3) गुढवादी जगताची अनुभूती घेण्यासाठी इत्यादी मते नोंदवली. आज भारतातच नव्हे तर बहुतांशी जगातील समाजामध्ये तरुणाईला मद्यपनाच्या अजगराने विळख्यात ओढलेले दिसून येते.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

ग्रामीण भागातील तरुण हा मद्यपानाच्या विळख्यात अडकल्यामुळे मद्यपानाच्या व्यसनामुळे ग्रामीण कुटुंबव्यवस्था पूर्णपणे विस्कळीत व उध्वस्त होत आहेत. ज्या तरुणावरती ज्यांचे कुटुंब आधारलेले आहेत अशा कुटुंबाची राख-रांगोळी मद्यपान करणाऱ्या तरुणांमुळे झालेली दिसते. त्या कुटुंबातील सदस्यांमध्ये दुरावा निर्माण होत आहे. सदस्यामधील ध्येयात एक वाक्यता दिसत नाही. त्या कुटुंबातील मुला बाळांचा, पालनपोषणाचा प्रश्न, वैयक्तिक आरोग्याचा प्रश्न, उत्पन्नाचा प्रश्न, यातून होणारी कर्जबाजारीपणा, मद्यपानामुळे त्यांचे कार्यक्षमतेवर होणारा परिणाम, यासारखे प्रश्न तीव्रतेने ज्या कुटुंबाला भेडसावतात या सर्व पैलूंचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांच्या वैयक्तिक शारीरिक व मानसिक आरोग्याचा, शैक्षणिक, सामाजिक आरोग्याचा प्रश्न, धार्मिक, नैतिकतेचा व सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रश्नांची कोणती टोके पुढे येत आहेत याचा अभ्यास करुन भविष्यात या तरुणांना सुखी आणि समृद्ध जीवन जगण्यासाठी प्रयत्न करावे लागतील याचा शोध घेणे गरजेचे आहे. एकविसाव्या शतकात पदार्पण झालेले असतानाच बदलत्या जीवनशैलीनुसार या समस्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. अशा अभ्यासातून तरुणांच्या मद्यपाना विषयी अनुकूल अशी उपाययोजना शोधता येईल. सामाजिक रचनेत उपयुक्त असे बदल समाज

प्रबोधनाने व कायद्याने करण्यासाठीही अशा विषयावर अभ्यास महत्त्वाचा ठरणार आहे. तरुणामध्ये वाढती मद्यपानाची संख्या निष्क्रिय करण्यासाठी हा अभ्यास निश्चितच दिशादर्शक ठरणार आहे. याच हेतुने संशोधक **"मद्यपान करणाऱ्या ग्रामीण समुदायातील तरुणांचा अभ्यास"** विशेष संदर्भ लातूर जिल्हा निवडला आहे.

संशोधनाचा कालावधी :-

1) सदर संशोधनामध्ये सुरुवातीच्या संशोधन साहित्याचा आढावा पहिल्या 6 महिन्यामध्ये घेण्यात येणार आहे.

2) मुलाखत अनुसूची तसेच गुणात्मक तथ्य संकलनाकरीता व्यस्टी अध्ययन पद्धती करीता आवश्यक असणारी प्रश्नांची सुची तयार करुन तपासणी ही प्रत्यक्ष क्षेत्रकार्याच्या माध्यमातून करण्याकरीता संशोधकास 2 महिन्याचा कालावधी अपेक्षीत आहे.

3) मुलाखत अनुसूचीची गुणवत्ता तपासणी झाल्यानंतर प्रत्यक्ष तथ्य संकलनाकरीता एकूण 6 महिन्याचा कालावधी ठेवण्यात आलेला आहे. त्याचबरोबर सदर संशोधनासाठी 20 निवेदकांच्या केस स्टडी करण्याकरीता संशोधकांनी 2 महिन्याचा कालावधी निश्चित केला आहे.

4) तथ्य संकलनानंतर संकलीत तथ्याचे संपादणुक (एडिटींग) सांकेतीकरण व मास्टरचार्ट किंवा SPSS सिस्टिमचा आधार घेवून सदर तथ्याचे विश्लेषणाकरीता व सारणीकरण आणि अर्थनिर्वचन या कार्याकरीता एकूण 6 महिन्याचा कालावधी अपेक्षीत आहे.

5) यानंतर निष्कर्ष व सुचना गृहतकृत्याची पडताळणी याकरीता 1 महिन्याचा कालावधी अपेक्षीत आहे.

6) उपलब्ध संशोधन साहित्याच्या आढाव्याच्या आधारे निरीक्षणाद्वारे घेण्यात आलेल्या नोंदी चर्चासत्रे व प्राप्त झालेल्या निष्कर्षाच्या आधारे पहिल्या प्रकरणाचा कच्चा ड्राफ्ट बनवण्याकरीता संशोधकांनी एकूनच 6 महिन्यासाठी ठेवला आहे.

7) शेवटच्या 6 महिन्यात उर्वरीत प्रक्रीया व प्रबंध अवहाल सर्व प्रक्रीया मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनानुसार वेळोवेळी तपासणी करुन सादर करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती :-

"मद्यपान करणाऱ्या ग्रामीण समुदायातील तरुणांचा एक समाजशास्त्रीय अभ्यास"

विशेष संदर्भ - लातूर जिल्हा या प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने मी माझ्या संशोधनामध्ये मद्यपी तरुण व त्याचे कुटुंब, कुटंबातील वातावरण, परिस्थिती याचा अभ्यास करणार आहे. त्याच बरोबर मद्यपी तरुणांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, वैवाहिक, शारिरीक, मानसिक, आर्थिक समस्याची कारणे व परिणाम समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून व शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणार आहे. त्याच बरोबर महाराष्ट्र शासनाचे मद्यपान विषयक धोरणे व कार्यक्रम, व्यसनमुक्ती केंद्राची भूमिका या सर्वांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनामध्ये करणार आहे.

संशोधन मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनासाठी **"मद्यपान करणाऱ्या ग्रामीण समुदायातील तरुणांचा एक समाजशास्त्रीय अभ्यास"** विशेष संदर्भ - लातूर जिल्हा हे कार्यक्षेत्र निवडले आहे. जिल्ह्यातील दहा तालुक्यातील मद्यपान करणाऱ्या तरुणांचा उपलब्धतेनुसार नमुना म्हणून निवडलेल्या उत्तरदात्यांनी माहितीच्या सत्यतेवर व या संशोधनातील विश्लेषणावर अवलंबून राहील.

1) निवेदक हे मद्यपानाच्या आधीन असल्या कारणामुळे संशोधकाच्या नियोजित वेळेत उलब्ध होण्याकरीता मर्यादा येऊ शकतात.

2) संशोधकाला प्रत्येक निवेदकाची त्यांच्या वेळेनुसार मुलाखतीचे आयोजन करावे लागेल. याकरीता वेळ व श्रम यामध्ये अडचणी निर्माण येऊ शकतात.

3) संशोधकाला मुलाखतीच्या अगोदर सदर अभ्यास प्रक्रियेची जागृतता प्रत्येक निवेदकामध्ये करण्यासाठी वेळेची मर्यादा येवू शकते.

4) निवेदकाच्या शारीरिक व मानसिक स्थिती नुसार मुलाखतीचे आयोजन करावे लागेल.

अध्ययन क्षेत्र :-

प्रस्तुत प्रबंधात नियोजित **"लातूर जिल्ह्यातील मद्यपान करणाऱ्या ग्रामीण समाजातील तरुणांचा एक समाजशास्त्रीय अभ्यास"** विषयाच्या अनुषंगाने लातूर जिल्ह्यातील दहा तालुक्यामधील एकूण 922 गावापैकी यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा उपयोग करुन एकूण 60 गावातून प्रत्येकी 5 निवेदकाची विविध क्षेत्रातील विविध व्यवसाय पदावरील कर्मचारी शेतकरी, शेतमजूर, कामगार अशा अनेक काम करणाऱ्या तरुणांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

कोणत्याही स्वरुपाची काय्र करण्यासाठी त्या विषयाची उद्दिष्ट्ये ठरवावे लागतात. जर उद्दिष्ट

ठरले नाही तर ते कार्य दिशाहीन स्वरुपाचे होते व त्या विषयाला योग्य न्याय मिळत नाही. तसेच अभ्यास केला तर एक नेमकी दिशा भेटत नाही. अभ्यासात सखोलता यावी म्हणून अभ्यास विषयाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

1. ग्रामीण समुदायातील मद्यपान करणाऱ्या तरुणांची वास्तविक स्थिती अभ्यासणे.
2. ग्रामीण समुदायातील मद्यपान करणाऱ्या तरुणांच्या वैयक्तिक कौटुंबीक, शैक्षणिक, वैवाहिक सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.
3. ग्रामीण समुदायातील मद्यपान करणाऱ्या तरुणाच्या शारिरीक, मानसिक आणि आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
4. महाराष्ट्र शासनाचे मद्यपान विषयक धोरण व कार्यक्रम अभ्यासणे.
5. ग्रामीण समुदायात मद्यपान संदर्भात व्यसनमुक्ती केंद्राची भूमिका अभ्यासणे.
6. मद्यपानाच्या मद्यपी व्यक्ती, कुटुंब व समाजावर होणारा परिणाम अभ्यासणे.

संशोधनाची गृहितके :-

सामाजिक शास्त्रामध्ये शास्त्रची निर्मिती करण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केला जातो. या पद्धतीचा अवलंब करण्यासाठी संशोधकाला संशोधन आराखड्याचे पुर्वज्ञान असणे आवश्यक असते. एखाद्या विषयाचा अभ्यास करण्यापूर्वी त्या विषयासंदर्भात काही उपकल्पना मनात गृहीत धरावे लागतात. त्या उपकल्पनांना आपल्या पूर्वज्ञानाशी संबंधित असे त्या विषयासंदर्भात संभाव्य अंदाज बांधावे लागते. त्यामुळे संशोधकाला आपल्या संशोधनाची दिशा आणि गती ठरवण्यात मदत होते. गृहीत विधानावर संशोधनाच्या निष्कर्षाचे बरेचसे स्वरुप अवलंबून असते गृहितके ही संशोधन मार्गदर्शन म्हणून मदत करतात. वैज्ञानिक अभ्यासपद्धतीने अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजेच गृहित कृत्य होय यालाच परिकल्पना, उपकल्पना असेही म्हणतात.

गुड आणि हॉट यांच्या मते - गृहीत कृत्य ही अशी मान्यता आहे की जी सत्य सिद्ध करण्यासाठी तिचे प्रयोगात्मक परीक्षण केले जाऊ शकते आणि पुढे संशोधनासाठीती उपयुक्त असते.

1. ग्रामीण समुदायात मद्यपाना विषयीच्या अज्ञानामुळे तरुणांमध्ये वाईट संगतीमुळे मद्यपानाचे प्रमाण वाढत आहे.
2. मद्यपानामुळे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक समस्यामध्ये वाढ होत असल्याचे दिसून येते.
3. मद्यपानामुळे गुन्हेगारी प्रवृत्तीत वाढ होत असताना दिसून येते.

4. मद्यपानाचे दुष्परिणाम या व्यसनमुक्ती केंद्राचे मद्यपी व्यक्तिवर सकारात्मक परिणाम होत असल्याचे दिसून येते.

5. मद्यपानामुळे कौटुंबिक व सामाजिक संघर्षामध्ये वाढ होत आहे.

6. मद्यपानामुळे कर्जबाजारीपणा वाढत आहे.

संशोधन विषयाची निवड :-

भारतीय समाजात आधुनिकीकरण, पाश्चिमात्यीकरण, मोबाईल, कॉम्पयुटर, इंटरनेटच्या विश्वात भारतीय समाज व्यवस्थेत अमुलाग्र बदल झालेले व होत असताना दिसून येत आहे यास ग्रामीण खेडी ही याला अपवाद नाहीत. ग्रामीण खेडे ही झपाट्याने बदलत असताना दिसत आहेत आणि या सर्वांचा केंद्रबिंदू हा आजचा तरुण आहे. बदलती जीवनशैली, राहणीमान, केश रचना, खान-पान यामध्येही अमुलाग्र बदल झालेले दिसून येते. या बदलत्या जीवनशैलीमुळे येणारे ताण-तणाव यातून भारतीय ग्रामीण भागात अनेक नवनवीन समस्या निर्माण होत आहेत.यामध्ये सुशिक्षित, अशिक्षित, बेकारी, सायबर गुन्हे, लोकसंख्या वाढ त्याचबरोबर आमली पदार्थाचे सेवन, तंबाखू, गुटखा, सिगारेट, चरस आणि सर्वात महत्त्वाचे मद्यपान या व्यसनाने आजचा तरुण होरपळून निघत आहेत. आजचा बहुतांश तरुण हा मद्यपानाच्या आहारी गेलेला दिसून येतो. मद्यपान हे आजच्या तरुणाच्या सर्वात जवळचे व्यसन झालेले दिसून येते.

या मद्यपानाच्या व्यसनामुळे समाज व्यवस्थेत व वैयक्तिक जीवनात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. मद्यपान ही केवळ व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनाशी निगडीत असणारी बाब नाही तर ती मद्यपानाच्या संबंधित व्यक्ती कुटुंब, समाज या सर्वांशी संबंधित तरुणांच्यावैयक्तिक शारीरिक, मानसिक आरोग्यावर त्याचा परिणाम होतोय. त्याचबरोबर समाज व्यवस्थेवर आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, कौटुंबिक या सर्व बाबींवर प्रतिकूल परिणाम होत असताना दिसून येते. यामध्ये मद्यपानामुळे तरुणांच्या संबंधित कुटुंबावर, सुखी कुटुंब आज उध्वस्त होत आहेत. आज मद्यपानाविषयी समाज प्रबोधनाची खरी गरज आहे. त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी व त्यांच्या जीवनातील स्वतःच्या अस्तित्त्वाची जाण करुन देण्यासाठी, **"मद्यपान करणाऱ्या ग्रामीण समुदायातील तरुणांचा एक समाजशास्त्रीय अभ्यास"** विशेष संदर्भ लातूर जिल्हा हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधन पद्धती :-

सदर संशोधनाचा अभ्यास गुणात्मक संशोधन पद्धतीतून करण्यात येणार आहे. संशोधन पद्धती म्हणून मुलाखत सहभागी निरीक्षण या तंत्राचा उपयोग करण्यात येणार आहे. तसेच मद्यपान करणाऱ्या तरुणांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून चिकित्सा करण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा :-

संशोधनाची उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यासाठी व संशोधनाला सुयोग्य दिशा देण्यासाठी विषयाचा विचारपूर्वक अंदाज घेऊन आराखड्याचे स्वरुप निश्चित करावे लागते. संशोधनात आराखड्याला विशेष महत्त्व आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय **"मद्यपान करणाऱ्या ग्रामीण समुदायातील तरुणांचा एक समाजशास्त्रीय अभ्यास"** विशेष संदर्भ - लातूर जिल्हा - हा असल्याने प्रस्तुत अध्ययनात विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन आराखडा या पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्या आधारे संशोधनाची दिशा ठरवून तथ्य संकलनासाठी अध्ययन केले जाऊन त्या आधारे मिळवलेल्या माहितीचे वर्गीकरण करुन निष्कर्ष काढले जातील.

गुणात्मक संशोधन पद्धती :-

सदर संशोधनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करुन पूर्ण करणार आहे. **अलन ब्रायमन** यांच्या मते, संशोधनाची रणनिती म्हणून गुणात्मक संशोधनात आधारसामग्रीचे संकलन आणि विश्लेषण या दोन्ही संख्यात्मकतेपेक्षा शब्दांना अधिक महत्त्व असते. या प्रकरच्या संशोधनात नैसर्गिक शास्त्रातील नियमाने व प्रारुपे नाकारलेली असतात.

डॅझिंन व लिंकन यांच्या मते - गुणात्मक संशोधनात घटनांतील व्यक्तिनिष्ठता व गुणात्मकता समजून घेण्यावर भर असतो. हे संशोधन एकाच वेळी आंतरविद्याशाखीय दुरदृष्टी, तंत्र व पद्धती वापरणारे असते. यात संख्याच्या मोजणी ऐवजी प्रायोगिक पद्धतीने पडताळणी ऐवजी अन्वयाला, अर्थमिमासाला अधिक महत्त्व असते. या पद्धतीने संशोधनाच्या गुणात्मक निकर्षावर भर दिला जातो. जमवलेल्या माहितीचे वर्णन करणे, त्याचा संबंध लावणे, इत्यादीसाठी ही पद्धत उपयोगी पडते. गुणात्मक पद्धतीने तथ्य गोळा करता येतात तसेच त्याचे स्पष्टीकरण देता येते. तुला पद्धतीचा भर किती पर्याय मिळेल त्यापेक्षा कोणत्या प्रकारचे पुरावे मिळाले यावर असतो. त्यामुळे संशोधकाला खरी परिस्थिती समजून घ्यायला मदत होते. सदर संशोधनामध्ये आम्ही गुणात्मकतेला अधिक महत्त्व दिले आहे. या दृष्टिकोनातून हे संशोधन कार्य पूर्ण करणार आहे.

तथ्य संकलन पद्धती :-

सामाजिक संशोधनात तथ्य व स्त्रोत महत्त्वाची असतात तथ्य व साधनांच्या आधारावरच निष्कर्ष मानले जातात त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी दोन प्रकारचे तथ्य संकलन असून त्यामध्ये प्राथमिक स्त्रोत व द्वितीय स्त्रोत यांचा समावेश होतो.

1) प्राथमिक स्त्रोत :-

यामध्ये प्राथमिक स्त्रोतमध्ये सहेतुक नमुना निवड घेऊन संधोधकांने प्रत्यक्ष सहभागी निरीक्षणे मुलाखत अनुसूची या स्त्रोतांचा वापर केला जाणार आहे. संशोधनाचे उद्देश व गृहीतकृत्य समोर ठेवून मुलाखत अनुसूची व त्यानुसार वस्तुनिष्ठ माहिती मिळवण्यासाठी उपयोगात आणले जाणार आहे. तसेच केस स्टडी माध्यमातून गुणात्मक तथ्याचे संकलन केले जाईल.

2) द्वितीयक स्त्रोत :-

याविषयी संबंधित संशोधनपर लेख, संदर्भ ग्रंथ, मासिके, पुस्तके, साप्ताहिके, दैनिके, विशेषांक, शासन अहवाल, शासन निर्णय, शोध पत्रिका या संबंधित विविध संकेतस्थळे इत्यादीचा वापर घेतला जाईल.

नमुना निवड :-

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनासाठी एकापेक्षा संशोधन पद्धतीचा वापर केला तरी काही अडचणीमुळे थोड्याफार मर्यादा पडतात. लातूर जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या 24 लाख 55 हजार 573 असून त्यातील 2001 च्या जनगणनेनुसार ग्रामीण लोकसंख्या ही 18 लाख 29 हजार 216 इतकी आहे. एकूण ग्रामीण पुरुष 9 लाख 24 हजार 118 असून त्यातील 18 ते 35 म्हणजे तरुण वयोगटातील असणारे तरुण 22 % प्रमाण आहे. ही सर्व माहिती सरकारी NGO व्यसनमुक्ती केंद्रे, सरकारी दवाखाने, मद्यपान करण्यासाठी परवाना देणारा विभाग, जिल्हा परिषद आरोग्य विभाग इत्यादीच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यातील 10825 मद्यपान करणाऱ्या तरुणांची संख्या 5 % 500, 10 % 1000,3 % 300. 5 % तरुणांची मद्यपानाच्या आधीन गेलेली संख्या आहे. त्याला आपण व्यसनी म्हणतो. उपलब्ध माहितीच्या आधारे गैर संभाव्य नमुना निवड पद्धती मधील सहेतूक नमूना निवडीचा आधार घेवून 300 निवेदकाचे निवड नमुना म्हणून करण्यात येणार आहे. त्याच बरोबर प्रत्येकी वैशिष्ट्यपूर्ण अशा 20 निवेदकाचे केस स्टडी करुन सदर संशोधन कार्य पूर्ण करण्यात येईल. ही अभ्यास विषयाची व्याप्ती असेल.

तथ्याचे वर्गीकरण :-

संशोधनासाठी संशोधक जी तथ्य संकलित करतो तो अस्पष्ट विस्तृत व अस्ताव्यस्त स्वरुपात असतात. अशा विस्तृत विखुरलेल्या तथ्यांच्या आधारे विश्लेषण करणे कठीण कार्य असते. तथ्याचे निर्वाचन सुलभतेने होण्यासाठी समजण्यायोग्य सारख्या आधारावर तथ्याचे गट पाळणे म्हणजे वर्गीकरण किंवा श्रेणीकरण होय. तथ्याचे विश्लेषण करणे सुलभ व्हावे यासाठी तथ्यामधील समान किंवा असमान बाबी कोणते आहेत हे निश्चित करावे लागते म्हणजेच पत्यांचे विविध प्रकार किंवा वर्ग पाडण्यासाठी काही आधार निवडावे लागतात. त्यामुळे विखुरलेले तथ्य एका निश्चित स्वरुपाच्या प्रकारात किंवा वर्गात स्पष्ट होऊ लागतात. तेव्हा प्रश्न संशोधनात त्याचे वर्गीकरणाचा योग्य प्रकारे उपयोग केला जाईल.

तथ्याचे विश्लेषण व निर्वाचन :-

तथ्याचे विश्लेषण व निर्वाचन केल्याशिवाय अध्ययनातुन निष्कर्ष काढणे शक्य होणार नाही. विश्लेषणाची परिणीती जर सामान्य स्वरुपाच्या निष्कर्षाच्या मांडणीत होत असेल तर संशोधनकर्त्याशी जाणून घ्यावयाचे असते की त्यांनी काढलेल्या निष्कर्षाचा वास्तविक अर्थ काय होतो अथवा या निष्कर्षामधून काय प्रतिबिंबित होते, निर्वाचन हेच जाणून घेण्याचा एक मार्ग असल्याने खऱ्या अर्थाने निर्वाचनाखेरीज विश्लेषणाच्या कार्याची सांगता होत नाही. यामध्ये केंद्रीय प्रवृत्तीचे मापके, सरासरी, टक्केवारी, सहसंबंध या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. विश्लेषणाबरोबरच निर्वाचनाचे अवलंब करण्यात येईल.

निष्कर्ष व शिफारशी :-

संशोधनातील निष्कर्ष व शिफारशी ही शेवटी येणारी पायरी आहे. संशोधनाच्या माध्यमातून जे कांही तथ्य प्राप्त होईल, त्याचे विश्लेषण निर्वाचन झाल्यानंतर त्याचे संक्षिप्त रुपात जे तत्त्व बाहेर येतात त्यास निष्कर्ष असे म्हणतात. प्राप्त झालेल्या निष्कर्षाचे विवेचन किंवा प्रस्तुतीकरण करण्याचे काम संशोधकाला करावयाचे आहे. तेव्हा निष्कर्षाची निर्वाचन झाल्यानंतर संशोधक गृहीतकृत्याची पडताळणी करुन प्रत्येक गृहितके सत्य व असत्य ठरले आहेत याची शहानिशा करण्यासाठी संशोधनात गृहीत धरुन त्याचा पडताळा करण्यात येणार आहे.

प्रकरणीकरण :

1) प्रकरण पहिले - प्रस्तावना : सदर प्रकरणामध्ये विषयाची साहित्य मिमांसा करुन त्याचे पुर्नवालोकन समाविष्ट आहे.

2) प्रकरण दुसरे - संशोधन पद्धती : सदर प्रकरण दोन भागामध्ये समावेश करण्यात आला आहे.

   A) संशोधन पद्धती, विषयाची निवड, महत्त्व, विषयाची व्याप्ती, उद्दिष्ट्ये, मर्यादा, गृहितके, आराखडा इ. घटकांचा समावेश आहे.

   B) संशोधन साहित्याचा आढावा

3) प्रकरण तिसरे - मद्यपानाचे परिणाम : यात ग्रामीण तरुणांचे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक कारणे व परिणामचा अभ्यास करणार आहे.

4) प्रकरण चौथे - मद्यपानाविषयीच्या विविध समस्या : यामध्ये ग्रामीण तरुणांच्या विविध समस्यांचा अभ्यास केला जाणार आहे.

5) प्रकरण पाचवे - मद्यपान विषयक शासन व प्रशासन यांचे धोरण व भूमिका : या प्रकरणामध्ये सद्यस्थितीत शासकीय धोरणे, प्रशासनांची भुमिका व अंमलबजावणी यांचा अभ्यास केला जाणार आहे.

6) प्रकरण सहावे - निष्कर्ष, शिफारशी : या प्रकरणामध्ये संशोधन अभ्यासाअंती प्राथमिक व दुय्यम माहितीच्या आधारे आढळून आलेले निष्कर्ष व शिफारशीची मांडणी करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :-

1. रा.ना.घोटाळे 2009-2010 - समाजशास्त्रीय संशोधन पद्धती व तत्त्वे, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती
2. संशोधन पद्धती 1981 महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, प्रा.पु.ल.भांडारकर
3. डॉ. सुनील जाधव - सामाजिक संशोधन पद्धती, अरुणा प्रकाशन, लातूर, 5 सप्टेंबर2012
4. डॉ. कऱ्हाडे बी.एम. - शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर 2007
5. प्रदीप आगलावे - संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर 1 जानेवारी 2000
6. नाडगुंडे नागनाथ - सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर 1986
7. डॉ. ढगे एस.के. - संशोधन पद्धती, के.एस. पब्लिकेशन, पुणे 16 सप्टेंबर 2011
8. प्रा. गंदेवार एस.एन.- भारतीय सामाजिक समस्या
9. रा.ज.लोटे - भारतातील सामाजिक समस्या
10. प्रा. तोरवणे डी.एल. - भारतीय समाज - वादातील विषय आणि समस्या
11. प्रा. मायी सुनील - भारतीय समाज प्रश्न आणि समस्या
12. राम अहुजा - सामाजिक समस्या आहे
13. www.Net.com-Marathi prahar
14. प्रा.माने माणिक - भारतातील समकालीन समस्या
15. प्रा.जयश्री महाजन - भारतीय समाज प्रश्न आणि सामाजिक समस्या
16. भारतीय सामाजिक समस्या, डॉ. काचोळे, प्रा. कुलकर्णी, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2023
17. सामाजिक विघटन व समस्या, पाटे सुमन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2005
18. समकालीन भारतीय समस्या, प्रा. मो.श. पराडकर, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद

संशोधक

बस्वराज विनायकराव पाटील

मार्गदर्शक

डॉ. वेदप्रकाश मलवाडे

समाजशास्त्र विभागप्रमुख

श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर